# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ११ मार्च, २०२५ / फाल्गुन २०, १९४६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री** | |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३१**

---

### चंद्रपूर जिल्ह्यात कोळसा खाणीत होणाऱ्या अतिउत्खननामुळे शेतीचे नुकसान होऊन खाणपट्टयातील जलस्त्रोतांनाही धोका निर्माण झाल्याबाबत

**(१) * २६९० श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कोळसा खाणी असून तेथील अतिउत्खननामुळे तसेच उत्खननासाठी कराव्या लागणाऱ्या स्फोटकांच्या वापरामुळे व तीव्र हादऱ्यांमुळे परिसरातील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून खाणपट्टयातील जलस्त्रोतांनाही धोका निर्माण झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोळसा खाणींमुळे परिसरातील भूजल पातळी अत्यंत खालावल्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणात पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भद्रावती येथे सुरु असलेल्या अरविंदो कंपनीची कोळसा खाण तसेच या परिसरात प्रस्तावित अनेक कोळसा खाणींमुळे उक्त प्रश्न अधिकच गंभीर स्वरुप धारण करण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोळसा खाणींमुळे होणारे उत्खनन व स्टोफामुळे शेतकऱ्यांचे संरक्षण करणे, जलस्त्रोतांचे नुकसाने टाळणे, भूजल पातळी वाढविणे, नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांना आर्थिक मदत देणे यांसदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई :** (१) चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणीमध्ये, केंद्रिय संस्थेकडून मंजूर खाणकाम योजनेनुसार व सुरक्षा निर्देशक, खाण सुरक्षा निर्देशालय, नागपूर यांच्या देखरेखीखाली नियंत्रीत स्फोट पध्दत (Control Blasting) या शास्त्रशुध्द पध्दतीने केलेल्या खनिज उत्खननामुळे परिसरातील शेती अथवा जलस्त्रोत, भूजल पातळी यावर परिणाम होत आहे, असे प्रथमदर्शनी दिसून येत नाही.

(२) कोळसा खाणी असलेल्या वरोरा तालुक्यातील ०१ आणि राजुरा तालुक्यातील ०९ गावाच्या परिक्षेत्रात, भूजल पातळीमध्ये घट झाली आहे, परंतु, जलसाठा संपलेला नाही तथापि, या १० गावातील पाणी पुरवठ्यांच्या स्त्रोतांचे बळकटीकरण करण्यासाठी जलजीवन मिशन अंतर्गत, शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडून सुरु आहे.
(३) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्ह्यातील अरविंदो कंपनीस मंजूर असलेल्या ९३६.०० हे. क्षेत्रापैकी ७८.०० हे. क्षेत्रामधून सध्या उत्खनन होत असून, सदरचे उत्खनन मंजूर खाणकाम योजनेनुसार व सुरक्षा निर्देशक, खाण सुरक्षा निर्देशालय, नागपूर यांच्या देखरेखीखाली नियंत्रीत स्फोट पध्दत (Control Blasting) या शास्त्रशुध्द पध्दतीने होत असल्याने, या खनिज उत्खननामुळे परिसरातील शेती अथवा जलस्त्रोत, भूजल पातळी यावर परिणाम होत आहे, असे प्रथमदर्शनी दिसून येत नाही.
(४) भारतीय खाण कायदा १९५२ व खनिज सवलत नियम १९६० तसेच कोळसा खाण नियंत्रण नियम २००४ मधील तरतुदीनुसार खाण व खाणीशी संबंधीत प्रक्रियेमुळे शेतीचे, घराचे व स्थनिकांचे नुकसान झाल्यास नुकसान भरपाई देण्याची तरतूद आहे. तथापि, याअंतर्गत नुकसान भरपाईसंदर्भात कोणतीही मागणी स्थानिक प्रशासनाकडे प्राप्त झालेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अक्कलकुवा व धडगाव (जि.नंदुरबार) तालुक्यातील गावांना वीज पुरवठा करण्याबाबत

**(२) * २६११ श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **अपारंपारिक ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अक्कलकुवा व धडगाव (जि.नंदुरबार) तालुक्यातील दुर्गम भागातील २२२ गावांमध्ये अद्यापही वीज पुरवठा करण्यात आला नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विजेअभावी या भागातील नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असून रात्री-अपरात्री सर्प दंशाच्या घटना घडून अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त २२२ गावांना तातडीने अपारंपरिक ऊर्जा स्त्रोताच्या माध्यमातून वीज पुरवठा करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) हे खरे नाही,

नंदुरबार जिल्हयातील अक्कलकुवा व धडगांव तालुक्यातील अनुक्रमे सर्व १९० व १६२ गावांचे विद्युतीकरण झाले आहे. त्यापैकी अक्कलकुवा व धडगांव तालुक्यातील अनुक्रमे १८५ व १३१ गावांना पारंपारिक पध्दतीने वीज पुरवठा सुरु असून, उर्वरित अक्कलकुवा व धडगांव तालुक्यातील अनुक्रमे ५ व ३१ गावांना सद्य:स्थितीत अपारंपारिक पध्दतीने वीज पुरवठा सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील बेस्ट, टाटा पॉवर, अदाणी तर राज्यभरात महावितरणकडून वीज दरवाढीच्या प्रस्तावाबाबत

**(३) * ६४८ श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात बेस्ट, उपनगरात टाटा पॉवर, अदाणी तसेच राज्यभरात महावितरणाकडून वीज दरवाढीबाबतचा प्रस्ताव वीज नियामक आयोगाला सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज दरवाढीमुळे शेतकरी, व्यावसायिक व नागरिकांच्या आर्थिक अडचणीत वाढ होणार असल्याने सर्व स्तरावरुन या प्रस्तावित वीज दरवाढीबाबत विरोध करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रस्तावित वीज दरवाढ रोखणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे,

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने (MERC) जारी केलेल्या बहुवर्षीय वीजदर विनियम, २०१९ व २०२४ अनुसार बेस्ट, टाटा पॉवर, अदाणी व महावितरण या वीज वितरण कंपन्यांमार्फत बहुवर्षीय वीजदर याचिका मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे (MERC) सादर करण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही,

सदर याचिकेमध्ये प्रथमच टप्प्या-टप्प्याने वीजदर कपातीबाबत महावितरणने बहुवर्षीय वीजदर याचिका मा.आयोगास सादर केली आहे. तसेच अदाणी इलेक्ट्रिसिटी, बेस्ट प्रशासन व टाटा पॉवर यांनीसुद्धा वीजदरात कपात प्रस्तावित केली आहे.

(३) विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. एकूण महसूलाची गरज व त्याप्रमाणात वीजदर ठरवून मिळावेत या करीता महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्याकडे वीज वितरण कंपनीतर्फे वीजदर सुधारणा प्रस्ताव सादर करण्यात येतो. या प्रस्तावाची मा. आयोगाकडून पडताळणी झाल्यानंतर वर्तमानपत्रात जाहिर सूचना करण्यात येते. त्यानंतर मा. आयोगातर्फे राज्यातील महसूली मुख्यालयांच्या ठिकाणी जाहिर सुनावणी घेण्यात येते. ग्राहकांनी / ग्राहक संस्थानी उपस्थित केलेल्या सूचना / हरकती / अभिप्राय विचारात घेऊन व संपूर्ण नियामक प्रक्रियेचा अवलंब करुन, मा.वीज नियामक आयोगाच्या बहुवार्षिक वीजदर याचिका आदेशानुसार (MYT Tariff Order) राज्यात वीजदर निश्चित केले जातात.

सदर वीजदर निश्चितीचे अधिकार मा.वीज नियामक आयोगास (MERC) आहेत. त्यानुसार सर्व नियामक प्रक्रियेचा अवलंब करुन मा. आयोगाद्वारे आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० या कालावधीसाठी वीजदर आदेश जारी करण्यात येतील. त्यानुसारच वीज वितरण कंपन्यांकडून वीज दराची आकारणी करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यातील रस्ते अपघातांच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(४) * २४१ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.विलास तरे (बोईसर), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी), श्री.राघवेंद्र (रामदादा) मनोहर पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रस्ते अपघातांच्या घटनेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून दरवर्षी हजारो लोक मृत्यूमुखी पडत असून त्याचे प्रमाण जवळजवळ ४४ टक्के आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी शासनाद्वारे रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात आले असून रस्ते अपघात रोखण्यासाठी सुरक्षा समितीची स्थापना करुन राज्यातील ९० महामार्गांवर इन्टेलिजन्स ट्राफिक मॅनेजमेंट सिस्टीम बसविण्याच्या घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी अद्यापही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अपघात रोखण्यासाठी आवश्यक तेथे सी.सी.टी.व्ही., गतीरोधक, दिशादर्शक फलक, नदी नाला व कॅनल वरुन जाणाऱ्या रस्त्यांवर संरक्षक भिंत, रेडीयम पट्ट्या, सर्व्हिस रोड, दुचाकीसाठी स्वतंत्र मार्गिका, रस्त्यांची दुरवस्था तसेच अपूर्ण व प्रलंबित कामे आणि यासाठी आवश्यक निधी इत्यादीबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) राज्यामध्ये सन २०२२ ते सन २०२४ या कालावधीमधील अपघातांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| | सन २०२२ | सन २०२३ | सन २०२४ |
|---|---|---|---|
| **अपघात** | ३३३८३ | ३५२४३ | ३६०८४ |
| **अपघाती मृत्यू** | १५२२४ | १५३६६ | १५३३५ |

महाराष्ट्रातील अपघाती मृत्यूचे प्रमाण संपूर्ण देशाच्या तुलनेत जवळपास ९% इतके आहे.
(२) नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेविषयी जनजागृती करण्याकरिता दरवर्षी संपूर्ण देशामध्ये रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येते.

रस्ता सुरक्षा निधी अंतर्गत रस्ता सुरक्षा निधी नियंत्रण समितीच्या मान्यतेच्या अनुषंगाने राज्यातील महत्वाच्या ९ राष्ट्रीय महामार्गांवर आणि सुमारे २१४०० किमी लांबीच्या महत्वाच्या रस्त्यांवरील अपघात प्रवण क्षेत्रांवर एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली उभारणे प्रस्तावित आहे.

(३) रस्ता सुरक्षा निधी अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यामध्ये दिनांक २०.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा रस्ता सुरक्षा उपाययोजना ही जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सुरू करण्यात आली आहे. सदर दिनांक २०.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा वार्षिक योजनेसाठी एकूण मंजूर निधीमधून या कामी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच, सदर निधीमधून सुचना फलक, वाहतुक चिन्हे, दिशादर्शक, रस्त्यांवर परावर्तक, ब्लिंकर्स, क्रॅशबॅरिअर लावणे, रस्त्यांवरील खड्डे बुजविणे या उपाययोजना करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हिमायतनगर (जि.नांदेड) तालुक्यात मागासवर्गीय प्रवर्गासाठी मोदी आवास योजनेतील घरकुले निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(५) * १२५१ श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिमायतनगर (जि.नांदेड) तालुक्यात मागासवर्गीय प्रवर्गासाठी मोदी आवास योजनेंतर्गत घरकुल मंजूर झालेल्या ९०० लाभधारकांना केवळ पहिला हप्ता रु.१५,०००/- अनुदान वितरित झाला असून पुढील हप्ते न मिळाल्याने घरकुलांची कामे प्रलंबित असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोदी आवास योजनेंतर्गत मागास प्रवर्गासाठी घरकुल मिळण्याची पहिलीच वेळ असल्याने त्यांना जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी देखील अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लाभार्थ्यांनी पहिला हप्ता प्राप्त झाल्यानंतर राहत्या निवाऱ्यावरच नवीन घरकुलाचे बांधकाम सुरु केले असून उर्वरित हप्ता प्रलंबित असल्यामुळे त्यांना उघड्यावर राहण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन लाभार्थ्यांना उर्वरित निधी तात्काळ उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मोदी आवास घरकुल योजनेंतर्गत सन २०२३-२४ करीता ३ लाख लाभार्थ्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून त्यांकरीता सन २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये एकूण रु.३३००.०० कोटी इतका निधी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण यांना वितरीत करण्यात आला आहे.

मोदी आवास घरकुल योजनेंतर्गत सन २०२३-२४ करीता नांदेड जिल्ह्यासाठी २३,५९८ इतके उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यामध्ये हिमायतनगर तालुक्यासाठी प्राप्त ९१० लाभार्थ्यांच्या उद्दिष्टानुसार जात प्रमाणपत्र व इतर कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर सर्व ९१० लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली आहे.

सदरहू ९१० लाभार्थ्यांपैकी ३१० लाभार्थ्यांचे घरकुल बांधकाम पुर्ण झाले असून उर्वरित घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदरहू लाभार्थ्यांपैकी ८६१ लाभार्थ्यांना पहिला हप्ता (रु.१५,०००/-), ४८५ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता (रु.४५,०००/-), ३७४ लाभार्थ्यांना तिसरा हप्ता (रु.४०,०००/-) व २९६ लाभार्थ्यांना चौथा हप्ता (रु.२०,०००/-) असा एकूण रु.५५६.२ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदरहू लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम पुर्ततेच्या टप्प्यानुसार उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यात पायाभुत सुविधा न उभारता शेतकऱ्यांना केबलद्वारे वीज पुरवठा करण्यात आल्याबाबत

**(६) * १०८८ श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरण आपल्या दारी या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना पोल, तारा व ट्रान्सफॉर्मर उभारून रितसर वीज जोडणी देण्याबाबत दिनांक १८ जून, २०१९ अन्वये शासन निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज पुरवठ्यासाठी आवश्यक पायाभुत सुविधा न उभारता शेतकऱ्यांना केबलद्वारे वीज पुरवठा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यामध्ये सन २०१० ते २०१४ दरम्यान या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना केबल टाकुन वीज पुरवठा करण्यात येत असून तेथे अद्यापही आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) अक्कलकोट तालुक्यामध्ये केबलव्दारे वीज पुरवठा सुरु करण्यात आलेल्या ६८४ शेतकऱ्यांपैकी २२८ शेतकऱ्यांसाठी रितसर लघुदाब वाहिनी, उच्चदाब वाहिनी व वितरण रोहित्रे इत्यादी पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या आहेत. उर्वरित ४५६ शेतकऱ्यांना केबलव्दारे वीज पुरवठा सुरु आहे.

कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२० अंतर्गत वीज जोडणी देण्यात आलेल्या व आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध नसलेल्या ग्राहकांना वीज बिलातून परताव्याच्या माध्यमातून आवश्यक पायाभूत सुविधा उभारणीचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला होता.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महानिर्मिती वीज कंपनीचे संच बंद असल्यामुळे वीज निर्मितीचा झालेला तुटवडा

**(७) * ४१२ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.अभिजीत पाटील (माढा), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठ्या प्रमाणात वीजेची आवश्यकता व मागणी असताना महानिर्मिती वीज कंपनीचे कोराडी येथील २, परळी येथील १ व चंद्रपूर येथील २ संच सद्य:स्थितीत बंद असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानिर्मितीची एकूण १३,२२० मेगावॅट इतकी क्षमता असताना सदरचे पाचही संच बिघडल्यामुळे त्याचा वीज निर्मितीवर परिणाम होऊन सद्य:स्थितीत केवळ ६,२२८ मेगावॅट इतकीच वीज निर्मिती होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी वीज निर्मिती केंद्राकडून मात्र मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती होत असताना महानिर्मितीने हे पाचही संच बंद ठेवण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, खाजगी कंपन्यांची वीज निर्मिती व विक्री सुरु ठेवण्यासाठीच हे संच जाणीवपूर्वक बंद ठेवण्यात आल्याची शंका विविध स्तरावरुन व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन उपरोक्त वीज संच सत्वर सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सदर संच खालील कालावधीत तांत्रिक कारणास्तव बंद पडले होते :-
कोराडी संच क्र.८ दि.३.१.२०२५ पासून दि. ५.१.२०२५ पर्यंत, कोराडी संच क्र.९ दि.३०.१२.२०२४ पासून दि.२०.१.२०२५ पर्यंत, परळी संच क्र.७ दि.३.१.२०२५ पासून दि.६.१.२०२५ पर्यंत, चंद्रपूर संच क्र.४ दि.२.१.२०२५ पासून दि.६.१.२०२५ पर्यंत, चंद्रपूर संच क्र.६ दि.१४.१२.२०२४ पासून दि.१९.२.२०२५ पर्यंत उपरोक्त सर्व संच उक्त कालावधीत दुरुस्तीची कामे पूर्ण करुन सुरु केलेले आहेत.
(२) हे खरे नाही.

महानिर्मिती कंपनीद्वारे राज्य भार प्रेषण केंद्राकडून (SLDC) मेरिट आर्डर डिस्पेच प्रमाणे प्राप्त आदेशानुसार विजनिर्मिती करण्यात येते.

महानिर्मिती कंपनीची एकूण स्थापित क्षमता १३२२० मेगावॅट इतकी असून मेरिट आर्डर डिस्पेच मध्ये बसणारी माहे जानेवारी २०२५ मध्ये सरासरी ७४४९ मेगावॅट व फेब्रुवारी, २०२५ मध्ये ७७२९ मेगावॅट इतकी विजनिर्मिती झालेली आहे.
(३) तांत्रिक दुरुस्तीच्या कारणास्तव वर नमूद कालावधीत वीज निर्मिती संच बंद होते.
(४) हे खरे नाही.

सदर संच तांत्रिक कारणामुळे बंद झालेले होते.
(५) सर्व संच तातडीने दुरुस्त करुन सुरु करण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) येथील दिवाणी न्यायालयामधे झालेला गैरव्यवहार

**(८) * २९२८ श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध शासकीय व अशासकीय लाभ वा मोबदला मिळविण्यासाठी आवश्यक असणारा वारसा हक्क दाखला प्राप्त करुन घेण्यासंदर्भात न्यायालयीन प्रक्रियेत लागणारा विलंब टाळण्यासाठी पनवेल (जि.रायगड) शहरातील न्यायालयात सुनावणीकरीता दाखल केलेल्या वारस दाखल्यांच्या दाव्यांमध्ये पनवेल येथील कनिष्ठ न्यायालयातील लिपिकाने मा.न्यायाधीश यांच्या संगणकाचा परस्पर वापर करुन त्यांचे बनावट शिक्के, स्वाक्षरी व बनावट चलनाद्वारे शेकडो वारस दाखले बेकायदेशीररित्या वाटप केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पध्दतीने प्राप्त करुन घेतलेल्या बनावट दाखल्यांच्या आधारे मोठ्या प्रमाणात शासकीय, निमशासकीय, खाजगी संस्थांमधून अवैधरित्या मोबदला मिळविण्यात आल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी पनवेल येथील दिवाणी न्यायालयाच्या अधिक्षिका यांनी ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर लिपिकाविरुद्ध दिनांक ४ नोव्हेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून या प्रकरणी सदरहू लिपिक व काही वकिलांना अटक करण्यात आली असून चौकशीअंती असे शेकडो बनावट दाखले दिल्याची कबुली सदरहू लिपिकाने दिली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची देण्यात आलेल्या बनावट दाखल्यांची व त्याआधारे घेतलेल्या लाभांची शासनाने सखोल चौकशी करुन यातील दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

पनवेल न्यायालयात अद्यापपर्यंत २ बनावट आदेश व ३ बनावट वारस दाखले निदर्शनास आले आहेत व त्या संबंधी पनवेल शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई येथील गुन्हा रजि. नं. ६७०/२०२४, गुन्हा रजि. नं. ७५८/२०२४, गुन्हा रजि. नं. १७/२०२५, गुन्हा रजि. नं. ७३/२०२५ व उरण पोलीस ठाणे येथील गुन्हा रजि. नं. ५/२०२५ अनुक्रमे दाखल करण्यात आले आहेत. तसेच अद्यापपर्यंत १३० बनावट ई-चलन व ४ वापरलेले कोर्ट फी स्टॅम्प निदर्शनास आले आहेत.
(२) हे खरे नाही.

पनवेल शहर पोलीस ठाणेकडे गुन्हयांचे तपासात शासकीय निमशासकीय खाजगी संस्थामध्ये बनावट वारस दाखले वापरण्याचा प्रयत्न झाला आहे. परंतु, त्याद्वारे अवैधरीत्या मोबदला मिळाल्याचे तपासात निष्पन्न नाही.

तसेच, उरण पोलीस ठाणे येथे अनंत रामा उर्फ रामभाऊ पाटील यांनी वारस दाखला मिळणेसाठी दिनांक १४/१२/२००६ रोजी दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उरण येथे अर्ज केला होता. सदरचा अर्ज दिवाणी न्यायालय उरण येथे प्रलंबित असताना दिवाणी चौकशी अर्ज नं. ३१९/२००६ मध्ये दिनांक ०२/०२/२००९ रोजी श्री.ए.डी.मनवर, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर उरण यांचे खोटया व बनावट सहीचा वारस दाखला तयार करून तो सिडको कार्यालयात दाखल केला आहे. अनंत रामा पाटील यांचा बनावट व खोटा वारस दाखला हा बनावट व खोटा असल्याबाबत सिडको कार्यालयात दिनांक १३/०७/२००९ रोजी हरिश्चंद्र रामा पाटील यांनी हरकत अर्ज दाखल केल्याने सदर वारस दाखल्यावर पुढील व्यवहार झालेला नाही.
(३) पनवेल शहर पोलीस ठाणे येथे एकुण ४ गुन्हे दाखल असून त्यात १ सहायक अधिक्षक, २ कनिष्ठ लिपिक, ५ वकिल व १ खरेदी विक्री दलाल असे एकुण ९ आरोपी अटक करण्यात आलेले आहेत. चौकशीअंती १३३ बनावट ई-चलान काढल्याची कबुली आरोपीने दिली आहे.
(४) याबाबत एकुण ५ गुन्हे (पनवेल शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे ४ व उरण पोलीस ठाणे येथे १) दाखल करण्यात आले असून पोलीस चौकशी सुरु आहे. तसेच, २ न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे व १ न्यायालयीन कर्मचाऱ्यावर निलंबनाची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मोठ्या प्रमाणात होणारे वायू प्रदूषण रोखण्याबाबत

**(९) * ६ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.सुरेश धस (आष्टी), श्रीमती श्रीजया चव्हाण (भोकर), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यासह मुंबई, मुंबई उपनगरे, नवी मुंबई, ठाणे तसेच पुणे या शहरात गेल्या काही महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात प्रदुषणात वाढ झाली असून, हवेचा दर्जा अत्यंत खालावलेला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठ्या प्रमाणात होत असलेले बांधकाम, ५० हजारांहून अधिक सुरु असलेल्या पारंपारिक बेकऱ्या, डिझेल-पेट्रोलवर चालणाऱ्या वाहनाच्या संख्येत वाढ, रासायनिक कारखानातून होणारे प्रदुषण, आग, वृक्षतोड, धुळ, कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट न लावता जाळला जाणे इत्यादी अनेक कारणास्तव प्रदुषणामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त शहरांमध्ये होणाऱ्या प्रदुषणासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने मुंबई महानगरपलिकेसह प्रदुषण नियंत्रण महामंडळ व राज्यशासनाच्या कार्यपध्दतीवर दिनांक ९ जानेवारी, २०२४ रोजी ताशेरे ओढलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रदुषणासंदर्भात शासनाने समिती देखील गठीत केली असून या संदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, महाराष्ट्र प्रदुषण नयिंत्रण महामंडळातील १३१० पदे रिक्त असतांनाही केवळ ३५ जागांसाठी जाहिरात काढण्यात आली हे ही खरे आहे काय,

(६) या उपरोक्त शहरामध्ये हजारो उद्योग मोठ्या प्रमाणात प्रदुषण पसरविणारे असतांनाही अशा उद्योगांचे कोणतेही पर्यावरणीय लेखा परिक्षण अथवा त्यांच्यावर कोणतेही नियंत्रण ठेवण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन प्रदुषण रोखणे व यात दोषी असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अशंत: खरे आहे. तथापि, मुंबई, मुंबई उपनगरे, नवी मुंबई, ठाणे या परिसरातील हवेचा दर्जा माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०२४ मध्ये हवा गुणवत्ता निर्देशांकानुसार मध्यम स्तराचा होता.
(२) अंशत: खरे आहे.सार्वजनिक आरोग्य विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार मुंबई शहर आणि उपनगरातील दवाखान्यांमध्ये नोंद झालेल्या श्वसन विकाराचा दमा, खोकला, इ. आजाराच्या रुग्ण संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे आढ़ळून येत नसल्याचे नमूद केले आहे.
(३) हे खरे नाही. तथापि, मा.उच्च न्यायालयाने (१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा पदांचा आकृतीबंध, (२) बेकरी, हॉटेल्स आणि भट्यांनी निर्माण केलेले प्रदूषण, (३) लाल युनिट्सचे ऑडिट, (४) प्रदूषण निर्देशक आणि मॉनिटर्सची स्थापना, इ. मुद्यांबाबत निरिक्षणे नोंदवून कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले आहेत.
(४) मा.उच्च न्यायालय मुंबई दाखल स्वहित याचिका क्र.३/२०२३ मध्ये मा.न्यायालयाने दि.३१/१०/२०२३, दि.०६/११/२०२३, दि.१०/११/२०२३, दि.११/१२/२३ व दि.०९/०१/२०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार शासनाने दि.०५/०२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मुंबई महानगर परिसरातील हवा प्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजना करण्यासाठी आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे.तसेच मा. उच्च न्यायालयाने दि.०९/०१/२०२५ रोजी दिलेल्या आदेशान्वये शासनाने (गृह विभाग) दि.२२/०१/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मुंबई महानगरक्षेत्रामध्ये पेट्रोल व डिझेलवर चालणाऱ्या वाहनांवर निर्बंध घालून फक्त सीएनजी व इलेक्ट्रीक वाहनांनाच परवानगी देण्याबाबत राज्य शासनाद्वारे परिपूर्ण अभ्यास करण्यासाठी समिती स्थापना करण्यात आली आहे.
(५) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामधील १३१० रिक्त पदांना महाराष्ट्र शासनाने दि. २९/०१/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता दिलेली आहे व त्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(६) व (७) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांची वेळोवळी पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान आढळून आलेल्या त्रूटींच्या अनुषंगाने पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येते.

-----------------

## राज्यातील विशेषत: मुंबईतील अनेक बेरोजगारांना परदेशात नोकरी देण्याचे आमिष दाखवून होत असलेली फसवणूक

**(१०) * ४४५५ श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: मुंबईतील अनेक बेरोजगारांना परदेशात नोकरी देण्याचे आमिष दाखवून व त्यांचेकडून लाखो रुपये घेऊन परदेशात पाठविण्यात आलेल्या अनेक बेरोजगारांची फसवणूक झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय
(२) असल्यास, याबाबत तुर्भे पोलिस स्टेशनमध्ये एक्स.पी.ओ. शिपींग मॅनेजमेंट विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परदेशात नोकरी देणाऱ्या एजंट वा कंपन्यांची चौकशी वा तपासणी करणेबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने यात हस्तक्षेप करुन यावर नियंत्रण आणणेसंदर्भात तसेच संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, खरे आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे एक्स.पी.ओ. शिपींग मॅनेजमेंट विरोधात गु. र. क्र.९८/२०२५ भारतीय न्यायसंहिता, २०२३ मधील कलम ३१८ (४) अन्वये दि.२४.०२.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच याप्रकारच्या आणखी एका प्रकरणात उरण पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गु. र. क्र.०३/२०२५ भारतीय दंड संहिता, १८६० मधील कलम ४२०, ४०६, ३४ अन्वये ०२ आरोपीं विरुध्द दि.१०.०१.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ४१ (अ) (१) अन्वये नोटीस देण्यात आलेली आहे. सदर आरोपींनी मा. सेशन कोर्टात अटकपुर्व जामीन मंजूरीबाबत अर्ज केला आहे. उक्त दोन्ही गुन्हे तपासाधीन आहेत.
(४) अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त होताच दोषींविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येते. तसेच पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई यांनी दि.२७.१२.२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये Financial Intelligence Unit ची स्थापन केलेली असून सदर कक्षामार्फत वित्तीय फसवणूकीबाबत जनजागृती व गुन्हेगारीस आळा घालण्याचे काम करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**न्याहाळपाडा (ता.वाडा, जि.पालघर) येथील बनावट नोटा बनविणाऱ्यांसह अवैध धंदे करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(११) * ३३८५ श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) न्याहाळपाडा (ता.वाडा, जि.पालघर) येथील एका तरुणाकडे बनावट नोटा बनविण्याचे साहित्य आढळून आले असून सदर तरुणाला मुंबईतील भायखळा (पूर्व) येथील पोलिसांनी दिनांक १४ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाडा शहरासह तालुक्यातील विविध भागात अशाप्रकारे बनावट नोटा बनविण्याचे रॅकेट कार्यरत असून तेथे मटका, जुगार, बेकायदा दारु विक्री, गुटखा विक्री, अवैध प्रवास वाहतूक असे अनेक अवैध धंदे राजरोसपणे सुरु असताना त्याकडे स्थानिक पोलीसांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या प्रकरणांमधील दोषींवर कारवाई करणेसह याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रस्तुत प्रकरणी भायखळा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१२/२०२५, भारतीय न्यायसंहिता कलम १७८,१७९,१८०,१८१,१८२,३(५) अन्वये दि.०९.०१.२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्ह्यात अद्यापपावेतो एकूण ०४ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

(२) वाडा तालुक्यातील पोलीसांचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे नाही. सन २०२४ मध्ये वाडा तालुक्यातील विविध भागात बेकायदा दारु केसेस ३३, जुगार ०२, अवैध प्रवासी वाहतुक २८, अंमली पदार्थ ०१ अशा प्रकारे अवैध धद्यांवर कायदेशीर कारवाई केली आहे. तसेच वाडा पोलीस ठाणे व हद्दीतील अवैध धद्यांचे समुळ उच्चाटन करण्याच्या अनुषंगाने विशेष मोहीम व महिन्यातून एकदा ऑल आऊट ऑपरेशन आयोजित करुन गुन्हेगार तपासणीसह अवैध धंद्यावर कारवाई करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी तालुक्यातील पारवा येथे शेत आखाड्यावर दरोडा टाकून महिलेवर सामुहिक अत्याचार केल्याबाबत

**(१२) * ५९६ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी तालुक्यातील पारवा येथे शेत आखाड्यावर दरोडा टाकून महिलेवर सामुहिक अत्याचार केल्याची घटना दिनांक ३ जानेवारी, २०२५ रोजीच्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षभरात परभणी जिल्ह्यात महिलांवरील अत्याचार, विनयभंग, छेडछाड अशा घटनांच्या संख्येमध्ये वाढ झाली असून माहे जानेवारी ते जुलै, २०२४ या सात महिन्यात महिला अत्याचाराचे ३७७ गुन्हे दाखल झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनांमुळे जिल्ह्यातील महिला, विद्यार्थीनी व अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी आरोपींविरुद्ध कारवाई करणेसह महिलांच्या सुरक्षेच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन परभणी ग्रामीण येथे गु.र.क्र.०५.२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ३१०(२), ३११,६४ (२) (एल), ७०(१), ३३३, ३५१(२)(३) अन्वये दि.०३.०१.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात दोन आरोपी असून त्यातील एक आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे व एक आरोपी पोलीस कोठडीत आहे.

(२) हे खरे नाही.

| विवरण | माहे जानेवारी ते जुलै,२०२३ | माहे जानेवारी ते जुलै,२०२४ | घट/वाढ |
|---|---|---|---|
| महिलावंरील विनयभंग व छेडछाडीचे गुन्हे | ३०२ | २४० | (-)६२ |

माहे जानेवारी ते जुलै, २०२३ व जानेवारी ते जुलै, २०२४ या कालावधीची तुलना केली असता महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये घट झालेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने १) महिला व मुलींची छेड काढणारे यांना प्रतिबंध करण्यासाठी २० निर्भया पथके कार्यरत आहेत. २) सदर पथकामध्ये शाळा, कॉलेज यांना वेळोवेळी भेट देण्यात येऊन महिलांविषयी असणाऱ्या कायद्यांसंदर्भात जगजागृती केली जाते तसेच प्रबोधन केले जाते. ३) वसतीगृह व ग्रामीण भागात असणारी आश्रमशाळा यांना भेटी देऊन त्यांच्या अडचणींबाबत चर्चा केली जाते. ४) पोलीस काका, पोलीस दीदी, निर्भया पथकांमार्फत महिलांवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जातात. ५) पोलीस स्टेशन स्तरावर महिला सुरक्षा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. ६) गर्दीची ठिकाणे, मंदिर परिसर, बाजारपेठ, खाजगी शिकवणीच्या ठिकाणांवर निर्भया पथकाद्वारे पेट्रोलिंग करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने इलेक्ट्रिक बस खरेदीच्या कराराबाबत

**(१३) * ६२१ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने ओलेक्ट्रा ग्रीनटेक आणि ईव्ही ट्रान्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्यांना ५१५० स्टॅंडर्ड आकाराच्या इलेक्ट्रिक बस खरेदीसाठी आणि त्यानंतर १२ वर्षे संचालन व देखभालीसाठी रुपये ७०३७८ कोटींचे काम दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम या कंपन्यांना प्रति किलोमीटर ७८ रुपये दराने मंजूर केले गेले, परंतू यासारखा करार नागपूर महानगरपालिकेने प्रति किलोमीटर ६२.९० रुपये दराने व मुंबई महानगरपालिकेच्या बेस्टनेही प्रति किलोमीटर ६४ रुपये दराने मंजूर केला असून या करारांचा सरासरी दर प्रति किलोमीटर सुमारे ६५ रुपये आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत या प्रकल्पांतर्गत एकूण १६८ इलेक्ट्रिक बसेस सुरु असून त्यामध्ये सरासरी एका किलोमीटर मागे २० रुपये इतके नुकसान होत असताना उपरोक्त ५१५० बसेस नव्याने दाखल झाल्यास ठरलेल्या कराराप्रमाणे बस चालल्या नाहीत तरीही त्यांना प्रतिदिन प्रति बस ठरलेली ३२५ कि.मी. हमी रक्कम द्यावी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या निर्णयामुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला हजारो कोटी रुपयांचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन सदर कंपन्यांचा करार रद्द करण्याबाबत तसेच यातील दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) रा.प.महामंडळाने ५१५० ई-बसेस भाडेतत्वावर घेणेकरीता ईव्ही ट्रान्स (एमएसआर) प्रायव्हेट लिमिटेड या पुरवठादार कंपनीसमवेत १२ वर्ष कालावधीकरीता करार केला आहे. सदर प्रकल्पाचा एकूण खर्च रुपये ५०,१७१.२६ कोटी इतका आहे.
(२) या प्रकल्पांतर्गत ०९ मीटर बसेसकरीता अनुदानासह रु.५८/- व अनुदानाशिवाय रु.६३/- तसेच १२ मीटर बसेसकरीता अनुदानासह रु.६८/- व अनुदानाशिवाय रु.७३/- असे दर निश्चित करण्यात आले आहेत.
(३) व (४) सद्यस्थितीत या बसेसद्वारे प्रत्यक्ष चालनातील किमी नुसारच पुरवठादारास देयके अदा करण्यात येत आहेत.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंदुरबार शहराच्या मध्यवर्ती भागात स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडर मधून दुसऱ्या सिलेंडरमध्ये गॅस भरत असताना पकडल्याबाबत

**(१४) * २४०१ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सिलेंडरमध्ये अनधिकृतरित्या गॅस भरताना किंवा अशा सिलेंडरच्या वापरामुळे अनेक ठिकाणी त्याचा स्फोट होऊन आगी लागल्यामुळे जीवित व वित्तहानी होण्याचे प्रकार निदर्शनास येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच, नंदुरबार शहराच्या मध्यवर्ती भागातून स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरमधून दुसऱ्या सिलेंडरमध्ये अनधिकृतरित्या गॅस भरताना पोलीसांनी छापा मारुन दोघांविरुध्द गुन्हा दाखल केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नंदुरबार शहरातील बऱ्याच ठिकाणी अशाच प्रकारच्या घटना घडत असतानाही शासनाने संबंधित अनधिकृत एलपीजी गॅस विक्रेत्यांविरुध्द कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशा बाबींवर नियंत्रण आणण्यासह संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

राज्यात सिलेंडरमध्ये अनधिकृतरित्या गॅस भरताना किंवा अशा सिलेंडरच्या वापरामुळे त्याचा स्फोट होऊन आगी लागण्याचे व जीवित व वित्तहाणी होण्याचे प्रकार घडलेले नाहीत.

तथापि जानेवारी २०२५ मध्ये राज्यात घरगुती गॅस सिलेंडर व व्यावसायीक गॅस सिलेंडर रिफीलींग करुन अनधिकृतरित्या विक्री केल्या प्रकरणी १०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

दिनांक १८/०१/२०२५ रोजी शास्त्री मार्केट, नंदुरबार येथे दोन आरोपींना अवैधरित्या गॅस भरतांना पोलीसांकडून छापा मारून अटक करण्यात आली आहे. त्यासंदर्भात नंदुरबार शहर पोलीस ठाणे येथे सदर आरोपींविरूद्ध गुरनं ५४/२०२५ भा.न्या.सं.क. २८७, २८८, १२५, ३(५) सह अत्यावश्यक वस्तू अधि.क. ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच नंदुरबार शहरात स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरमधून दुसऱ्या सिलेंडरमध्ये गॅस भरताना छापे मारण्याची कारवाई करुन नंदुरबार शहर पोलीस ठाणे येथे आणखी ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

नंदुरबार शहरात अवैधरित्या स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडमधून दुसऱ्या गॅस सिलेंडरमध्ये गॅस भरत असतांना मिळुन आलेल्या गॅस विक्रेत्यांवर पोलीस विभागामार्फत कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

(४) अवैधरित्या स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरमधून दुसऱ्या सिलेंडरमध्ये गॅस भरणाऱ्या अनधिकृत गॅस विक्रेत्यांविरुध्द भारतीय न्याय संहिता व अत्यावश्यक वस्तु अधिनियम प्रमाणे पोलीस विभागामार्फत आरोपींना तात्काळ अटक करुन त्यांच्याविरूद्ध गुन्हे दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील खरे-ढेरे-भोसले महाविद्यालयातील संस्थाचालकांनी बेकायदेशीर व नियमबाह्य कामे करुन प्राध्यापकांना केलेली मारहाण

**(१५)** * **२४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि.रत्नागिरी) येथील खरे-ढेरे-भोसले महाविद्यालयातील प्रवेश, हजेरीपासून सर्व बनावट कागदपत्रे दाखवून, बोगस परीक्षा घेवून त्याची खोटी माहिती मुंबई विद्यापीठाकडे पाठवून विद्यार्थ्यांना थेट पदवी प्रमाणपत्र देण्यात येत असून त्यातून करोडो रूपयांचा गैरव्यवहार सुरू असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालयात चालणारी अशा प्रकारची नियमबाहय कामे करण्यास नकार दिला म्हणून खरे-ढेरे भोसले महाविद्यालयातील संस्था चालकांनी तीन प्राध्यापकांना दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास केलेल्या मारहाणीत तिन्ही प्राध्यापक गंभीररित्या जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बुक्टू या प्राध्यापक संघटनेने सदर महाविद्यालयात चालणाऱ्या बेकायदेशीर व नियमबाहय कामांबाबत मुंबई विद्यापीठाकडे तक्रार केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी तक्रार नोंदविण्यासाठी प्राध्यापक पोलीस ठाण्यात गेले असता, संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंदवून न घेता पोलिसांनी संशयित आरोपींना सहकार्य करुन त्यांना अटक करण्यास जाणीवपूर्वक विलंब केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या महाविद्यालयात चालणारे बेकायेदशीर कामकाज व देण्यात आलेल्या बोगस पदव्यांबाबत चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी करुनही त्यावर अद्याप कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) खरे-ढेरे-भोसले महाविद्यालयातील तीन प्राध्यापकांना दि.१८ डिसेंबर, २०२४ रोजी मारहाण झाली असून त्यामध्ये फिर्यादी यांचेसह एकूण ०४ व्यक्ती जखमी झालेल्या आहेत. प्राप्त वैद्यकीय प्रमाणापत्रानुसार जखमी व्यक्तींना झालेल्या दुखापती गंभीर नसून साध्या आहेत.

(३) हे खरे आहे.

दि.२१.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये बुक्टू या प्राध्यापक संघटनेने खरे-ढेरे-भोसले महाविद्यालय, गुहागर, जि.रत्नागिरी येथे प्राध्यापकांना संस्थाचालकांकडून झालेल्या अमानुष मारहाणीबाबत मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, कुलगुरु, मुंबई विद्यापीठ यांच्याकडे तक्रार केली आहे.

(४) सदर प्रकरणी घटना घडल्यानंतर फिर्यादी व साक्षीदार हे जखमी अवस्थेत पोलीस ठाण्यात आल्यानंतर त्यांना उपचार यादी देऊन त्यांच्यावर वैद्यकीय उपचार झाल्यानंतर फिर्यादी समक्ष पोलीस ठाणे हजर राहून त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपींविरुध्द गुहागर, जि. रत्नागिरी पो. ठाणे येथे गु.र. क्र.१०१/२०२४ भा.न्या.सं.कलम १३२, ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२), १८९ (२), १९२ (२), १९०, १३१, १२१ (१) अन्वये दिनांक १८.१२.२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(५) हे खरे नाही.

सदर महाविद्यालयातील बेकायदेशीर कामकाजाबाबत व देण्यात आलेल्या बोगस पदव्यांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून चौकशी करण्याबाबत विद्यापीठ प्रशासनाकडे अर्ज प्राप्त नाही.

(६) बुक्टू या प्राध्यापक संघटनेने दि.२१.१२.२०२४ रोजी केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाकडून दि.३०.१२.२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी चौकशी समितीची नियुक्ती करण्यात आली असून समितीने त्यांचा अंतरिम अहवाल मुंबई विद्यापीठास दि.२८.०२.२०२५ रोजी सादर केला आहे.

तसेच, प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने पोलीसांकडे दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यामधील एकूण ६ आरोपींपैकी ५ आरोपींना अटक करण्यात आली होती. सदर आरोपी सध्या जामीनावर आहे. एका आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर झालेला आहे. सदर गुन्ह्यातील सर्व आरोपी यांच्यावर भा.ना.सु.सं. कलम १२६ प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पोलीस तपास सुरु आहे.

-----------------

**यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना घरकुलास मंजूरीसह निधी मिळण्याबाबत**

**(१६) * ८८७ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेअंतर्गत मंजूर घरांच्या अनुदानाची देय रक्कम प्रलंबित असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेअंतर्गत विशेषत: चंद्रपूर, सोलापूर, परभणी जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना मंजूर घरकुलाचे लाभ व निधी देण्याबाबत इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सादर केलेल्या प्रस्तावांवर अद्याप कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेअंतर्गत अनुदानाची प्रलंबित रक्कम वितरीत करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन सदर प्रस्तावांना मंजुरीसह तात्काळ निधी उपलब्ध करून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) हे अंशत: खरे आहे.

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत सन २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये एकूण १० वसाहती व ११,२२६ घरकुलांना मंजुरी देण्यात आली असून त्यासाठी आवश्यक पुर्ण निधी रु.१४८.१४ कोटी वितरीत करण्यात आला आहे.

तसेच, सन २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये एकूण २ वसाहती व १,४४,६०४ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. सदरहू घरकुलांकरीता सद्य:स्थितीत रु.२२२.४५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून उर्वरित निधी योजनेंतर्गत उपलब्ध होणारी आर्थिक तरतूद आणि घरकुल बांधकामाच्या प्रगती टप्प्यानुसार वितरीत करण्यात येईल.

(२) हे खरे नाही.

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत सन २०२१-२०२२ ते २०२४-२५ या कालावधीत चंद्रपूर जिल्ह्यातील १५,०५८ घरकुलांना, सोलापूर जिल्ह्यातील ४५१ घरकुलांना व परभणी जिल्ह्यातील ८,६१७ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. सदरहू घरकुलांसाठी अनुक्रमे रु.९५.८२ कोटी, रु.१.२२ कोटी आणि रु.८.२४ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) हे खरे आहे.

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत उपलब्ध होणारी आर्थिक तरतूद आणि घरकुल बांधकामाच्या प्रगती टप्प्यानुसार अनुदानाची प्रलंबित रक्कम वितरीत करण्यात येईल.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय मार्गावरील हॉटेल व ढाब्यांवर अवैध व्यवसाय सुरु असल्याबाबत

**(१७) * १०६ श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील मौजे ससूपाडा गाव (ता. वसई) ते मौजे आचड (ता.तलासरी) पर्यंत मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.०८ वर रस्त्याच्या दुतर्फा शासनाच्या आणि आदिवासी बांधवांच्या जागेवर अतिक्रमण करुन अनधिकृतरित्या लहान-मोठे हॉटेल व ढाबे सुरु असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनोर हलोली येथील एका ढाब्यावर इंधन आणि रसायनांच्या अवैध व्यवसायावर पोलिसांनी कारवाई केल्यानंतरही त्या परिसरातील हॉटेल व धाब्यांवर आणि आजुबाजूच्या परिसरामध्ये अवैधरीत्या भंगार, सळया, डिझेल आणि विविध रसायनांची बेकायदा खरेदी-विक्री सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अवैध व्यवसाय निदर्शनास येऊ नये याकरिता महामार्गालगत दर्शनी भागात पत्र्यांचे मोठे शेड उभारुन सदर बेकायदेशीर व्यवसाय सुरु असून ज्वालाग्रही रसायनांच्या वापरामुळे आजूबाजूच्या परिसरात आग लागून मोठा अपघात होण्याची बाब तेथील स्थानिक ग्रामस्थांनी निदर्शनास आणूनही या प्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अतिक्रमित अनधिकृत व्यवसायांचे निष्कासन करणे, शासकीय व आदिवासींच्या जमिनी परत करणेबाबत तसेच दोषी व्यावसायिक व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

सदर बाबत जिल्हास्तरीय वनहक्क कमिटी यांचेकडून खातेदार यांना वाटप करण्यांत आलेल्या क्षेत्राचा वापर त्यांनी उपजिविकेच्या खऱ्याखुऱ्या गरजांसाठी न करता व्यावसायासाठी केल्याने खातेदार यांनी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ व वन (संवर्धन) अधिनियम १९८० च्या कायद्याचा भंग केल्याचे स्पष्ट होत आहे. त्याअनुषंगाने खातेदारांचे वनपट्टे रद्द करणे बाबत शिफारस करण्यात आली आहे.

(२) व (३) होय, हे अंशतः खरे आहे.

सदर बाबत मनोर पोलीस ठाणे हद्दीतील-चौरसिया ढाब्यामागे ऑईल सदृश्य द्रव्यपदार्थ साठा व विक्री करीत असल्याबाबत मनोर पोलीस व पुरवठा अधिकारी, तहसिल कार्यालय पालघर यांनी सयुंक्त कारवाई केलेली असुन रु.१,८०,०००/- चा माल जप्त करुन मनोर - पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नंबर ०७/२०२५ - भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम २८७ सह जिवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३, ७ तसेच मोटर स्पीरीट ॲण्ड हायस्पीड डीझेल ऑर्डर २००५ (पुरवठा नियमन व वितरण व गैरव्यवहार प्रतिबंध) चे कलम २ (ए), २ (ई), २ (एफ), २ (एच), २ (एम), २ (एन), २(ओ), २ (पी), २ (क्यु) व ३ (४), ३ (५), ३ (६) प्रमाणे दिनांक

०८.०१.२०२५ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. तसेच रसायनांची बेकायदा खरेदी विक्री होवु नये म्हणुन महामार्गावर नेहमी पेट्रोलिंग नेमण्यात येत असुन महामार्गावरील हॉटेल व ढाब्यांच्या परिसराची वारंवार तपासणी करण्यात येत आहे. स्थानिक ग्रामस्थांकडुन सदर बाबत तक्रार अर्ज प्राप्त झालेले असून सदरचा परिसर वारवांर तपास करुन सन २०२४ ते आजपावेतो ईसी ॲक्ट प्रमाणे ०३ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२४ प्रमाणे ०९ कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-आग्रा (जि.ठाणे) रोडवरील लालचौकी परिसरात रस्ता ओलांडणाऱ्या आई व मुलाचा अपघात होऊन झालेला मृत्यू

**(१८) * ४७०१ श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील कल्याण–आग्रा रोडवरील लालचौकी परिसरात कल्याण–डोंबिवली पालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाच्या भरधाव ट्रकने रस्ता ओलांडणाऱ्या आई व मुलाला धडक दिल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान घडली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपघाताची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने दोषींविरुध्द कारवाई करण्यासह मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) बाजारपेठ पोलीस स्टेशन गुन्हा र. क्र. ३१/२०२५, भा. न्या. संहिता कलम १०६ (१), २८१, १२५ सह मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १८४, प्रमाणे दि. ०८.०१.२०२५ रोजी स्टे.डा.नं. ४२/१५.५३ वाजता दाखल केला आहे.

(३) डंपर क्रमांक एम.एच.०४/एफ.जे. ९२३७ चा चालक नामे वैभव बाळु वैराळ, वय २६ वर्षे यास दि.०८.०१.२०२५ रोजी २२.०३ वा. अटक करण्यात आली आहे. महाराष्ट्र अपघात प्राधिकरण यांच्या आदेशानुसार आर्थिक भरपाईची कार्यवाही विमा कंपनीकडून करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे वाघोली (ता.हवेली, जि.पुणे) शहरांतील फुटपाथवर झोपलेल्या कुटुंबाला मद्यधुंद डंपर चालकाने चिरडल्याबाबत

**(१९) * २०१३ श्री.ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके (शिरुर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाघोली (ता.हवेली, जि.पुणे) शहरातील केसनंद फाटा परिसरात फुटपाथवर झोपलेल्या कुटुंबावर मद्यधुंद डंपर चालकाने वाहन चढवून ९ जणांना चिरडण्याची घटना माहे डिसेंबर २०२४ मध्ये घडली असल्याचे निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त अपघातात एकाच कुटुंबातील ३ निष्पाप व्यक्तींचा जागीच मृत्यू व काही जण गंभीर जखमी झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी मद्यधुंद डंपरचालक व डंपरमालक यांच्यावर शासनाने सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून मृत व जखमींना आर्थिक मदत देणेबाबत तसेच दोषींवर कारवाई करणेसह अशाप्रकारचे गंभीर अपघात टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. दि.२३.१२.२०२४ रोजी मौजे वाघोली, ता.हवेली, जि.पुणे येथील केसनंद फाटा येथे चालकाने त्याच्या ताब्यातील हायवा डंपर दारुच्या नशेत भरधाव वेगाने चालवून डिवायडरवर चढवून फुटपाथवर झोपलेल्या ९ जणांना चिरडण्याची घटना घडलेली आहे.
(२) होय, खरे आहे. सदरच्या अपघातामध्ये एकाच कुटुंबातील ३ निष्पाप नागरिकांचा जागीच मृत्यू आणि काही नागरिक गंभीररित्या जखमी झालेले आहेत.
(३) सदर प्रकरणी प्राप्त फिर्यादीवरुन वाघोली पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं. १२१७/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १०५, २८१, १२५(a), १२५(b) सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १८५ अन्वये डंपर चालक, डंपर मालक आणि व्यावसायिक यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) सदरील अपघातामध्ये मृत्युमुखी पडलेल्या व गंभीर जखमी नागरिकांना व वारसदारांना आर्थिक मदत करण्याबाबत तहसिलदार / अपर तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, लोणी काळभोर यांना वाघोली पोलीस स्टेशन,पुणे शहर यांचेकडील दि.१२.०१.२०२५ अन्वये पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. तसेच असे गंभीर अपघात टाळण्यासाठी पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर यांचे कार्यालयाकडून दि.०४.१०.२०२४ अन्वये प्रसिध्दीपत्रक जारी केले असून त्यामध्ये पुणे शहरातील लोणीकंद वाहतुक विभागार्तंगत वाहतुक सुरक्षित व सुरळीत होणेकरीता, गृह विभागाच्या दिनांक २७.०९.१९९६ च्या अधिसूचनेनुसार तसेच मोटार वाहन कायदा कलम ११४, ११६(१), (ए) (बी), ११६ (४) आणि ११७ अन्वये अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रूग्णवाहीका, पी.एम.पी.एल. व खाजगी बसेस इत्यादी) खेरीज सदर ठिकाणी तसेच मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या इतर अंतर्गत रस्त्यावर विहीत वेळेत सर्व प्रकारच्या जड / अवजड / मंदगती (डंपर / ओ.एम.सी. मिक्सर / जे.सी.बी. / रोड रोलर व इत्यादी तत्सम) वाहनांची वाहतुक तसेच पार्किंग करणेस बंदी करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयातील शेतकऱ्यांचे कुक्कुटपालन, शेळीपालन गोठा पशुसंवर्धन अशा विविध योजनांचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(२०) * ७१० श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयात शेतकरी मोठ्या प्रमाणात कुक्कुटपालन, शेळीपालन, गोठा पशुसंवर्धन अशा विविध व्यवसायांवर अवलंबून असून यासाठी शासनाचे मिळणारे अनुदान गत १ वर्षापासून अद्यापही शेतकऱ्यांना प्राप्त झाले नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील अनुदानाअभावी शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना थकीत अनुदान तातडीने अदा करणेबाबत तसेच यात दिरंगाई करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) अशंत: खरे आहे.

नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत शेळी वाटप व कुक्कुट पालन अंतर्गत परिपूर्ण प्रस्ताव सादर करणाऱ्या सर्व लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे. मात्र, महात्मा-गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत गोठा पालनासाठी केंद्र शासनाकडून निधी अप्राप्त असल्याने ४.३० कोटी इतका निधी थकित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील पुणे-सातारा रस्त्यावर संशयास्पद फिरणाऱ्या व्यक्तीकडे बनावट नोटा मिळाल्याबाबत

**(२१) * ३१२० श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील पुणे-सातारा रस्त्यावर संशयास्पद फिरणाऱ्या श्री.निलेश विरकर या व्यक्तीला सहकार नगर पोलीसांनी अटक केली असता त्याचेकडे ५०० रुपयांच्या ३०० बनावट नोटा आढळून आल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बनावट नोटा मुंबई व परराज्यातून येत असून या प्रकरणी नवी मुंबई व अन्य ठिकाणाहून अन्य तीन ते चार व्यक्तींना अटक करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून संबधित दोषीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, राज्यात मोठ्या प्रमाणात बनावट नोटांचा होत असलेला वापर व त्यावर आळा घालण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे. पुणे शहरातील पुणे-सातारा रस्त्यावर संशयास्पद फिरणाऱ्या श्री.निलेश विरकर या व्यक्तीला सहकारनगर पोलीसांनी दि.०९ ऑक्टोबर, २०२४ रोजी अटक केली असून त्याच्याकडे रु.५००/- चलनाच्या २५१ बनावट नोटा मिळून आलेल्या आहेत.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे. सहकारनगर पोलीस ठाणे, पुणे शहर येथे दाखल भा.न्या.सं.२०२३ चे कलम १८०, ३१८ (४) प्रमाणे दाखल गु.र.नं.३३९/२०२४ मधील तपासामध्ये चिंचवड, पुणे येथून एक, कोपरखैरने, नवी मुंबई येथून तीन आणि नालासोपारा, पालघर येथून एक अश्या ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तसेच सदरहू गुन्ह्याच्या तपासामध्ये परराज्यातून कोणालाही अटक केलेली नाही अथवा कोणताही मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला नाही. सदर गुन्ह्याचा संपूर्ण तपास पूर्ण झाला असून मा.न्यायालयामध्ये दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. सद्यस्थितीत ३ आरोपी न्यायालयीन कोठडीत असून २ आरोपी जामीनावर मुक्त आहेत.

(४) राज्यात मोठ्या प्रमाणात बनावट नोटांचा होत असलेला वापर व त्यावर आळा घालण्यासंदर्भात पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दि.०२.०८.२००८ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व पोलीस घटक कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई, नवी मुंबई तसेच ठाणे जिल्ह्यातील कल्याण व उल्हासनगर येथील डान्सबार रात्री उशिरापर्यंत सुरू ठेवले जात असल्याबाबत

**(२२) * ९५५ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, नवी मुंबई तसेच ठाणे जिल्ह्यातील कल्याण व उल्हासनगर येथील डान्सबार मोठ्या प्रमाणावर रात्री उशिरापर्यंत बेकायदेशीररित्या सुरु असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिसरातील डान्सबारमुळे तरुण पिढी उध्द्वस्त होत असून मोठ्या प्रमाणाच्या व्यसनाच्या आहारी जात असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर डान्सबार हे स्थानिक अधिकारी तसेच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या संगनमताने सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन डान्सबारचे मालक व संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यामधील अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ अंतर्गत बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत एकूण ३ ध्वनीमुद्रीत संगीतावरील नृत्य परवाने देण्यात आले आहेत. नवी मुंबई व ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत एकही परवाना देण्यात आलेला नाही. मुंबई, नवी मुंबई तसेच ठाणे जिल्ह्यातील कल्याण व उल्हासनगर येथे रात्री उशिरापर्यंत बेकायदेशीररित्या डान्सबार सुरु असल्याबाबत तक्रारी प्राप्त नाहीत.

तथापि, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ३३ नुसार गठित सार्वजनिक मनोरंजन नियमावलीनुसार, बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत लाईव्ह ऑर्केस्ट्रा बार आस्थापनांनी परवाना नियमांचे उल्लंघन केल्याने सन २०२४ मध्ये १ ऑर्केस्ट्रा बारचा परवाना रद्द करण्यात आला असून १४६ ऑर्केस्ट्रा बारचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत लाईव्ह ऑर्केस्ट्रा बार आस्थापनांनी परवाना नियमांचे उल्लंघन केल्याने सन २०२४ मध्ये १ ऑर्केस्ट्रा बारचा परवाना रद्द करण्यात आला असून ११ ऑर्केस्ट्रा बारचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तसेच, ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत लाईव्ह ऑर्केस्ट्रा बार आस्थापनांनी परवाना नियमांचे उल्लंघन केल्याने सन २०२५ मध्ये १ ऑर्केस्ट्रा बारचा परवाना निलंबित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने एसटी तिकीट दरात केलेली भाडेवाढ

**(२३) * २८०५ श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.संजय देरकर (वणी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात परिवहन विभागाच्या राज्य परिवहन प्राधिकरणाच्या माहे जानेवारी, २०२५ मध्ये झालेल्या बैठकीत एस.टी.च्या तिकिट दरात १५ टक्के भाडे वाढीच्या प्रस्तावाला मंजूरी देण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निर्णयास राज्य शासनाची मान्यता घेण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, एकीकडे एस.टी.बसेस व डेपोची दुरवस्था झालेली असून दर्जेदार सुविधांचा अभाव असताना दुसरीकडे अशाप्रकारे केलेल्या भाडेवाढीमुळे सर्वसामान्य जनतेचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एस.टी.बस प्रवासासाठी सवलतीच्या अनेक योजना शासनामार्फत राबविल्या जात असताना महिला व विद्यार्थ्यांना ५० टक्के तिकिट दरात प्रवास अनुज्ञेय असला तरीही या भाडेवाढीचा परिणाम त्यांचेवर देखील पडणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर भाडेवाढ रोखणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) व (२) केंद्रीय मोटर वाहन अधिनियम १९८८ च्या कलम ६७ (२) नुसार भाडेवाढीचा अधिकार राज्य परिवहन प्राधिकरणाला आहे.

राज्य परिवहन प्राधिकरणाच्या दि.२३.०१.२०२५ रोजी पार पडलेल्या २७६ व्या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवास भाड्यात १४.९५% ची वाढ करण्यासाठी दिनांक २५ जानेवारी, २०२५ पासून मंजुरी देण्यात आली आहे.
(३) व (४) सदर भाडेवाढ ही सर्वप्रवर्गातील प्रवाशांकरिता लागू करण्यात आली आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईमध्ये वाहनांची संख्या वाढत असल्याने होणारे प्रदूषण व वाहतूक कोंडी रोखण्याबाबत

**(२४) * ४२४८ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत मोठ्या प्रमाणात वाढत असलेल्या वाहन संख्येमुळे होत असलेली वाहतूक कोंडी, प्रदूषणामुळे होणारी पर्यावरणाची हानी तसेच त्याचे आरोग्यावर होणारे विपरीत परिणाम, यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत गतवर्षात २.५४ लाख वाहनांची नोंदणी झाली असून एकूण वाहनांची संख्या ४६ लाखांपर्यंत गेली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात नियोजन करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही वा वाहनांची नियमित तपासणी करण्यात येत नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मुंबईतील ४ प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये वाहन पोर्टलवरील नोंद असणाऱ्या वाहनांची संख्या ३८,५३,०७० इतकी आहे.

(३) व (४) राज्यात वायुवेग पथकांमार्फत पी.यु.सी प्रमाणपत्र न बाळगणाऱ्या तसेच प्रदूषण करणाऱ्या वाहनांविरुध्द नियमित कारवाई करण्यात येते.

मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मुंबई शहराच्या दहिसर नाका, आनंद नगर नाका, मुलूंड (जुना) नाका, ऐरोली नाका व मानखुर्द नाका या ५ जकात नाक्यांवर वायु प्रदूषण करणाऱ्या वाहनांबाबत विशेष तपासणी मोहीम नोंव्हेबर-२०२३ पासुन सुरु असून २४ तास वाहन तपासणी केली जाते. तसेच वायु प्रदूषण व ध्वनी प्रदूषण करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येते.

वाहनांची संख्या कमी रहावी व टॅक्सी/रिक्षांचा पर्याप्त क्षमतेने वापर होण्यासाठी शहरात विविध मार्गावर शेअर-ए-टॅक्सी/रिक्षा सेवा कार्यान्वित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नेप्ती (ता.नगर, जि.अहिल्यानगर) गावच्या शिवारात महावितरणच्या वीज वाहिनीची तार तुटून दोन शाळकरी मुलांचा झालेला मृत्यू

**(२५) * १६२ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेप्ती (ता.नगर, जि.अहिल्यानगर) गावातील शिवारातून गेलेल्या महावितरणच्या वीज वाहिनीची तार तुटून अंगावर पडल्याने दोन शाळकरी मुलांचा जागीच मृत्यू झाल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरणच्या वीज वाहिन्यांची तपासणी नियमित करणे आवश्यक असताना उक्त परिसरातील तपासण्या विभागामार्फत करण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणेबाबत व यातील संबंधित दोषीं असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

निंबळक बायपास जवळ, नेप्ती शिवारातील, लांडे स्थळ येथील बंधाऱ्यास दि.२४.०९.२०२४ रोजी व पुर्वी ५ ते ७ दिवस प्रचंड पावसाने ओढा, नाला, नदीस मोठा पूर आला व त्यामुळे पोलच्या आजूबाजूची माती व

दगड वाहून गेले. पोल तारांच्या दिशेने झुकल्यामुळे लघुदाब वाहिनीच्या उपरी तारा खाली आल्या होत्या. दि.२४.०९.२०२४ रोजी मयत मुले बंधाऱ्यावर गेली असता लघुदाब वाहिनीच्या उपरी तारांच्या संपर्कात आल्याने सदर अपघात घडला व त्यात त्यांचा मृत्यू झाला.

(२) हे खरे नाही.

महावितरण कंपनीच्या शाखा कार्यालयामार्फत पावसाळयापूर्वी करण्यात येणारी देखभाल व दुरुस्तीची तांत्रिक कामे उच्चदाब वाहिनी खालील झाडाच्या फांदया तोडणे, लघुदाब वाहिनी खालील झाडाच्या फांदया तोडणे, लघुदाब वाहिनी मध्ये जास्त लोंबकळणाऱ्या झोळ पडलेल्या तारांच्या मध्ये पोल टाकणे तसेच त्यात आवश्यक ठिकाणी स्पेसर टाकणे तसेच वितरण पेटी बदलणे अशी कामे करण्यात आलेली आहेत.

(३) सदर अपघाताची विद्युत निरीक्षक कार्यालयामार्फत सखोल चौकशी करण्यात आली असून त्याबाबतचा चौकशी अहवाल महावितरण कंपनीच्या विभागीय कार्यालयास दिला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने दोन्ही अपघातग्रस्तांच्या वारसास प्रत्येकी रु.४.०० लाख इतकी नुकसान भरपाई देण्याबाबतच्या प्रस्तावास महावितरण कंपनीमार्फत दि.२५.०२.२०२५ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे.

सदर मयत मुलांचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यातील रहिवासी नसून, उत्तरप्रदेश व बिहार राज्यातील असल्याने त्यांना आर्थिक मदत देण्यासाठी संबंधित कुटुंबियांकडे संपर्क साधून त्यांचेकडून रितसर अर्ज प्राप्त करुन घेतला आहे. महावितरण कंपनीकडून सदर मयत मुलांच्या वारसदारास नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

दिनांक २४.०९.२०२४ व पुर्वी ५ ते ७ दिवस प्रचंड पावसाने ओढा, नाला, नदीस मोठा पूर आला व त्यामुळे पोलच्या आजूबाजूची माती व दगड वाहून गेल्याने, पोल तारांच्या दिशेने झुकल्यामुळे व मयत मुले लघुदाब वाहिनीच्या उपरी तारांच्या संपर्कात आल्याने सदर अपघात घडला आहे. सबब, सदर अपघातास व्यक्तिशः कुणीही जबाबदार नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी, धाराशिव व समृद्धी महामार्गावर गोवंशीय प्राण्याची वाहतूक करणाऱ्या वाहनांस पोलीसांनी पकडल्याबाबत

**(२६) * ११७ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील काही काळात रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यातील लोटे, चिपळूण तालुक्यातील कामथे, पिंपळी, रत्नागिरी शहर, मंडणगड आदी ठिकाणी गोहत्या तसेच गोवंश जनावरांच्या बेकायदेशीर वाहतुकीच्या घटना उघडकीस आल्या असतानाच खेड (जि.रत्नागिरी) शहरातील खारी-देवणे पुलानजीक दिनांक २२ व २३ डिसेंबर, २०२४ रोजी गोवंश अवशेष आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक नागरिकांनी मोर्चा काढून बंद पाळल्याने तसेच गोवंश हत्येतील गुन्हेगारांना सहकार्य करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्रान्वये माहे जानेवारी, २०२५ मध्ये मा.मुख्यमंत्री तथा गृह मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच धाराशिव जिल्ह्यात गत वर्षात गोवंशीय प्राण्यांची अनधिकृतपणे वाहतूक प्रकरणी पोलीसांनी जवळपास १२७ प्रकरणी गुन्हे दाखल केल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२५ वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) तसेच समृध्दी महामार्गावरील शिर्डी टोलनाक्यावर सुमारे १७०० किलो गोमांसची वाहतूक करणाऱ्या वाहनांस पोलिसांनी पकडले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणांची शासनाने चौकशी करुन गोहत्या, गोवंश जनावरांची बेकायदेशीर वाहतूक रोखणेसह यातील दोषींवर व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) गोवंश जनावरांचे अवशेष आढळून आल्याने संतप्त झालेल्या स्थानिक नागरीकांनी मोर्चा काढलेला होता. तसेच सदर प्रकरणी राजकीय नेते, स्थानिक पुढारी व नागरीकांनी पोलीस ठाणे येथे निवेदने दिली होती. परंतु गोवंश हत्तेतील गुन्हेगारांना सहकार्य करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी किंवा निवेदन तथा पत्र प्राप्त नाही.

(३) अंशत: खरे आहे.

धाराशिव जिल्ह्यात सन २०२४ ते ३१.०१.२०२५ पर्यंत बेकायदेशीर गोवंश वाहतूक संबंधी १०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) अंशत: खरे आहे.

कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन हद्दीत समृध्दी महामार्गावर २००० किलो गोमांसाची वाहतूक करणाऱ्या वाहनास पोलीसांनी पकडले आहे.

(५) (१) रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यातील खेड पो.स्टे येथे अनुक्रमे गु.र.न. ४११/२०२४, गु.र.न. ३४९/२०२४, गु.र.न. ३५१/२०२४, गु.र.न. ३५४/२०२४ तसेच रत्नागिरी शहर येथे गु.र.न. ११/२०२४, रत्नागिरी ग्रामीण पो.स्टे येथे अनुक्रमे गु.र.न. ४९/२०२४, गु.र.न. ५१/२०२४, गु.र.न. ११७/२०२४, गु.र.न. ११८/२०२४, मंडणगड पो.स्टे येथे गु.र.न. ७४/२०२४, अलोरे-शिरगाव पो.स्टे येथे अनुक्रमे गु.र.न. ०३/२०२५, गु.र.न. ८०/२०२४ गुन्हे दाखल करण्यात येऊन कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यांमध्ये १४ आरोपीना अटक करण्यात आली होती. तसेच १५ आरोपीना नोटिसा बसविण्यात आल्या होत्या. अटक केलेल्या सर्व आरोपींना जामीन मिळाला आहे.

(२) धाराशिव जिल्ह्यात सन २०२४ ते दि.३१.०१.२०२५ पर्यंत बेकायदेशीर गोवंश वाहतूक संबंधी १०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन हद्दीत समृध्दी महामार्गावर २००० किलो गोमांसाची वाहतूक करणाऱ्या वाहनास पोलीसांनी पकडले असून कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन येथे गु.र.न. ३९/२०२५, दि.१५.०२.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर प्रकरणी भारतीय न्याय सुरक्षा संहिता ३५(३) प्रमाणे समजपत्र अदा केले असुन त्यांच्यावर जा.क्र.२६१/२०२५ अन्वये चॅप्टर केस क्रमांक ११५/२०२५ दि.१५.०२.२०२५ रोजी केली आहे.

सदर प्रकरणी कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश असल्याचे निष्पन्न झालेले नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विदर्भातील ३८ आगाराचे उत्पन्न तोट्यात जात असल्याबाबत

**(२७) * २७४६ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, तर महिलांना ५० टक्के सवलतीची प्रवास योजना लागू केल्यामुळे विदर्भातील ५९ आगारापैकी ३८ आगाराचे उत्पन्न तोट्यात असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर प्रदेशातील २६ पैकी १३ आगाराचे तीन कोटी ८४ लाख ३४ हजार, तर अमरावती प्रदेशातील ३३ पैकी २५ आगाराचे ४ कोटी ७६ लाख ७० हजार रुपयांचे नुकसान झाले असून उक्त ठिकाणच्या आगारांचे माहे नोव्हेंबर २०२४ मध्ये एकूण सुमारे ८.५ कोटी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे यवतमाळ विभागातील ७ आगारांचे सर्वाधिक नुकसान झाले असून राज्य परिवहन महामंडळाकडून प्रवासी वाहतूकीसाठी उक्त ठिकाणच्या आगारांपुढे उत्पन्न वाढविण्याचे आव्हान निर्माण आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अपुऱ्या निधीअभावी प्रवाशांना मुलभूत सुविधांपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात एसटी महामंडळाचे आर्थिक उत्पन्नात वाढ करण्यासह होणारे नुकसान रोखण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) नाही.

(२) गतवर्षीच्या तुलनेत नागपूर प्रदेशात ०६ व अमरावती प्रदेशात १२९ बसेस कमी असल्याने चलनीय नियते व कि.मी कमी झाले. त्यामुळे अपेक्षित उत्पन्न प्राप्त झाले नाही.

(३) व (४) गतवर्षीच्या तुलनेत ३१ बसेस कमी झाल्याने तसेच विविध खर्चात झालेल्या वाढीचा प्रतिकुल परिणाम प्रवाशी वाहतुकीवर झाला आहे.

(५) व (६) रा.प.महामंडळाचे उत्पन्नात वाढ करण्यासाठी महामंडळाकडुन सर्व आगार/ विभागांना दैनंदिन उत्पन्नाचे उद्दीष्टे देण्यात आले असुन उद्दिष्ट पुर्तीसाठी विभागांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

चालक/वाहक यांना कामगिरीनिहाय उत्पन्नाचे उद्दीष्ट देण्यात आले असुन उद्दीष्टापेक्षा जास्त उत्पन्न आणणाऱ्या चालक/वाहक यांना प्रोत्साहन भत्ता देण्याची योजना राबविण्यात आली आहे. तसेच विशेष मार्ग तपासणी कार्यक्रम राबविण्यात आला आहे. रा.प. महामंडळाचे उत्पन्न वाढीसाठी चालक /वाहक यांचे वेळोवेळी प्रबोधन करण्यात येत आहे.

तसेच रा.प महामंडळाच्या ताफ्यामध्ये स्वमालकीच्या साध्या व ई-बसेस टप्प्या टप्याने दाखल होत आहे.

----------------

## मालेगांव (जि. नाशिक) शहरातील बारा बंगला येथे परस्पर बनावट कागदपत्रे दाखवून केलेला गैरव्यवहार

**(२८) * ७२५ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरातील बारा बंगला येथे बालफोल्ड इमारतीसमोर असलेल्या मोकळया भूखंडाच्या व्यवहाराप्रकरणी परस्पर बनावट कागदपत्रे बनवून एका महिलेची पाच जणांनी सुमारे २ कोटी १३ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहारासंदर्भात छावणी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली असून, महिलेची फसवणूक करणाऱ्या श्री.वासू यांच्याविरुद्ध यापुर्वी कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्यासंदर्भात अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी फिर्यादीने दि.१८.०१.२०२५ रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपींनी एकूण २ कोटी १३ लाख रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. परंतु, यामध्ये बनावट कागदपत्रांचा वापर झाल्याची नोंद तक्रारीमध्ये दिसुन येत नाही.

(२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणातील आरोपी श्री.वासू यांच्याविरोधात यापूर्वी मालेगाव छावणी पोलीस ठाणे येथे आर्थिक गैरव्यवहारासंबंधित एकूण ०५ गुन्हे दाखल आहेत.

(३) सदर प्रकरणी, मालेगाव छावणी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २७/२०२५, भा. दं. वि. कलम ४२०, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये दि. १८.०१.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात बेकायदेशीररित्या टर्मिव्हा या इंजेक्शनची विक्री होत असल्याबाबत

**(२९) * ३१२६ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील अनेक भागात नशेचे प्रमाण वाढत असून त्यासाठी "टर्मिव्हा" या नावाच्या इंजेक्शनचा मोठ्या प्रमाणात वापर होत असून त्याच्या विक्रीचे रॅकेट कार्यरत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हडपसर-माळवाडी भागामध्ये वास्तव्यास असणाऱ्या अंबिका उर्फ नेहा आनंद सिंह ठाकुर या तरुणीला टर्मिव्हा या इंजेक्शनची बेकायदेशीररित्या विक्री करताना हडपसर पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजी वा त्यासुमारास रंगेहात पकडल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तिच्या राहत्या घराची झडती घेतली असता आणखी काही इंजेक्शनच्या बाटल्या, नशेकरिता वापरण्यात येणारे अन्य साहित्य हस्तगत करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशा प्रकारांवर आळा बसविणेबाबत तसेच संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

Termiva या नावाच्या इंजेक्शनच्या अनाधिकाराने बेकायदेशीररित्या विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगल्याने आरोपीविरुद्ध हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं. १९४१ / २०२४, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२३, २७५, २७८, १२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तथापि, सदर औषधाच्या विक्रीचे रॅकेट कार्यरत असल्याचे आढळून आले नाही.
(२) हे खरे आहे.
(३) होय, हे अंशतः खरे आहे.

सदर प्रकरणातील आरोपीच्या राहत्या घराची झडती घेतली असता, Termiva या इंजेक्शनच्या आणखी काही बाटल्या हस्तगत करण्यात आल्या आहेत. परंतू नशेकरीता वापरण्यात येणारे अन्य कोणतेही साहित्य हस्तगत करण्यात आलेले नाही.
(४) दिनांक २६/१२/२०२४ हडपसर पोलिस व औषध निरीक्षक, पुणे यांच्या पथकाने Termiva (MEPHENTERMINE SULPHATE INJECTION १६० vials) या औषधांची विक्री करीत असताना सदर आरोपीस अटक करण्यात आली असुन सदर आरोपीवर हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं. १९४१ / २०२४, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच हडपसर पोलीस स्टेशन चॅप्टर केस नंबर ३०/२०२५, बी.एन.एस.एस. कलम १२९ (ग) प्रमाणे दिनांक ३१/०१/२०२५ अन्वये प्रतिबंधक कार्यवाही देखील करण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी औषध निरीक्षक, पुणे यांनी जप्त साठयांमधुन औषधाचे दोन नमुने चाचणीसाठी अन्न व औषध नियंत्रण प्रयोगशाळा, मुंबई येथे पाठविले आहेत. सदर प्रयोगशाळेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर औषध व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० अंतर्गत पुढील कारवाई करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिखलोली (जि.ठाणे) परिसरातील एम्पायर इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनीने बनावट स्वाक्षरी व शिक्का तयार करून केलेला गैरव्यवहार

**(३०)** * **२०७५ श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखलोली (जि.ठाणे) परिसरातील एम्पायर इंडस्ट्रीज लिमिटेड या बांधकाम क्षेत्रातील कंपनीने त्यांच्या प्रकल्पाचे मुदत वाढ शुल्क माफ करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उपजिल्हाधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी यांची बनावट स्वाक्षरी व कार्यालयाचा बनावट शिक्का तयार करून तब्बल ६ कोटी ७९ लक्ष ६७ हजार रुपये माफ करून घेवून इमारत बांधकाम पूर्णत्वाचा दाखला तयार केल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इमारत बांधकाम पूर्णत्वाचा दाखला व इतर कागदपत्रे एमआयडीसीकडे सादर करणाऱ्या कंपनीविरोधात अंबरनाथ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) आणि (३) मे.एम्पायर इंडस्ट्रिज लि. या कंपनीचे संचालक, व्यवस्थापक व हस्तक यांचेविरुध्द श्री. सुनिल भुताळे, उप जिल्हाधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी यांची बनावट स्वाक्षरी व कार्यालयाचा बनावट शिक्का वापरुन बनावट दस्तऐवज तयार केल्याप्रकरणी, अंबरनाथ पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे दि.०३.१२.२०२४ रोजी गु.र.क्र.१४३६/२०२४, भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३४०(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विटा (ता.खानापूर, जि.सांगली) येथील कार्वे औद्योगिक वसाहतीतील ड्रग्जचा साठा जप्त केल्याबाबत

**(३१) * ३६७८ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विटा (ता.खानापूर, जि.सांगली) येथील कार्वे औद्योगिक वसाहतीत सांगली स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने छापा टाकून मेफेड्रॉन (एमडी) ड्रग्जचा सुमारे ३० कोटी रुपयांचे साडेचौदा किलो एमडी ड्रग्ज व रसायने जप्त केली असल्याची बाब दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुर्वी इरळी व कुपवाड (ता.कवळेमहांकाळ, जि.सांगली) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये एमडी ड्रग्जचा कारखाना पोलिसांनी उद्ध्वस्त केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) विटा (ता.खानापूर, जि.सांगली) येथील कार्वे औद्योगिक वसाहती मध्ये स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सांगली यांनी छापा टाकून कारवाई केली आहे. सदर कारवाईत मेफेड्रॉन (एम. डी. ड्रग्ज) तयार करण्याचा कारखाना व मेफेड्रॉन ड्रग्ज मिळून आल्याने विटा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ५२/२५ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ चे कलम ८ (क), २१ (क), २५, २९ अन्वये दि.२८.०१.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात मेफेड्रॉन (एम.डी.ड्रग्ज) व ते बनवण्यासाठी लागणारे केमिकल आणि इतर साहित्य असे सर्व मिळून एकुण रु.२९,७३,५६,२००/-किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ७ आरोपींना अटक करण्यात आली असुन सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

इरळी, ता.कवठेमहांकाळ येथे एमडी ड्रग्जची निर्मिती करणाऱ्या कारखान्यावर कारवाई करुन कुर्ला पोलीस ठाणे यांनी गु.र.न. १२/२४ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ चे कलम ८ (क), २१(क), २९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तसेच कुपवाड, ता.मिरज एम.आय.डी.सी. मध्ये समर्थ पोलीस ठाणे, पुणे शहर यांनी गु.र.न. ३८/२४ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ चे कलम ८ (क), २१ (क), २९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.